केंद्र पुरस्कृत योजना

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजनेचे निकष | पात्र लाभार्थी | देय लाभ रक्कम | अर्ज सादर करण्याची प्रक्रिया/ ऑनलाइन असल्यास लिंक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | १) मजुरी थेट लाभार्थ्यांच्या बँक किंवा पोस्ट ऑफिस खात्यात जमा केली जाते. | १) अर्जदार भारताचा नागरिक आणि ग्रामीण भागातील रहिवासी असावा. | १ एप्रिल २०२५ पासून केंद्र सरकारच्या नवीन अधिसूचनेनुसार, महाराष्ट्रातील मजुरी दर ₹ ३१२ प्रतिदिन झाला आहे. | इच्छुक व्यक्ती साध्या कागदावर अर्ज किंवा तोंडी विनंती स्थानिक ग्रामपंचायतीकडे करू शकतात. |
| | | २) पुरुष आणि महिलांना कामासाठी समान मजुरी दिली जाते. | २) वय १८ वर्षांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. | | |
| | | ३) शक्यतो गावाच्या ५किमी त्रिज्येमध्ये काम दिले जाते. त्यापेक्षा दूर असल्यास १०% अतिरिक्त मजुरी मिळते. | ३) जॉबकार्ड असणे आवश्यक आहे. | | |
| | | ४) बेरोजगारी भत्ता: अर्ज केल्यावर १५ दिवसांत काम न मिळाल्यास, शासन नियमानुसार बेरोजगारी भत्ता देय असतो. | | | |